RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—ल

वर्ष १, अंक ६२(३)] मंगळवार, सप्टेंबर २९, २०१५/आश्विन ७, शके १९३७ [पृष्ठे १०, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक १७६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ सप्टेंबर २०१५

**अधिसूचना**

**कारखाने अधिनियम, १९४८.**

क्रमांक एफएसी. ११/२०१४/प्र.क्र. ३४७/कामगार-४.—कारखाने अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३) याच्या कलम ११२ आणि ११५ तसेच सर्वसाधारण खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) च्या कलम २३ चे खंड (३), कलम ११५ चे नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनास याद्वारे महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे सर्व नियम उक्त अधिनियमाच्या उप कलम (१), कलम ११५ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र कारखाने (सुधारणा) नियम, २०१५ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या नियम २ मधील पोट-नियम (एन) नंतर खालील पोटनियम (ओ) समाविष्ट करण्यात येईल :—

(ओ) धोकादायक कारखाना,—

धोकादायक कारखाने म्हणजे, असा कारखाना ज्या कारखान्यातील उत्पादन प्रक्रियेत ज्वालाग्राही, विषारी, स्फोटक, गंजमय व अत्यंत प्रतिक्रियात्मक रसायनांचा वापर, साठवणूक व हाताळणी होते किंवा अशा पदार्थांचे उत्पादन प्रक्रियेत उत्सर्जन होते.

ज्वालाग्राही, विषारी, स्फोटक यांच्या व्याख्येसाठी, महाराष्ट्र कारखाने (औद्योगिक अति धोकादायक अपघातांचे नियंत्रण) नियम, २००३ चा संदर्भ आणि अत्यंत प्रतिक्रियात्मक रसायनांच्या व्याख्येसाठी, महाराष्ट्र कारखाने (औद्योगिक अति धोकादायक अपघातांचे नियंत्रण) नियम, २००३ मधील नियम २ (अ) (२) खालील परिशिष्ट २ च्या भाग १ चा गट ३ व सदर नियमांमधील, नियम ६ (१) (अ) व (ब) चा संदर्भ, तसेच गंजमय रसायनाच्या व्याख्येसाठी महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या नियम ११४ खालील परिशिष्ट १२ मधील तरतुदींचा संदर्भ घ्यावा.

३. (*i*) नियम ३ च्या पोट-नियम (१) मध्ये " कारखाना " या शब्दांऐवजी " धोकादायक कारखाना " हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

(*ii*) नियम ३ च्या पोट-नियम (२) नंतर खाली विनिर्दिष्ट केलेले पोटनियम (३) व (४) नव्याने समावेश करण्यात येतील :-

(३) " धोकादायक कारखान्या व्यतिरिक्त असलेल्या कारखान्याबाबत "

ज्या जागेवर कारखाना उभारावयाचा असेल, त्या जागेसाठी परवानगी मिळण्यासाठी आणि एखादा कारखाना बांधण्यासाठी किंवा त्याचा विस्तार करण्यासाठी मुख्य निरीक्षक, यांचेकडे अर्ज केला पाहिजे.

अशा परवानगीसाठी नमुना १ मध्ये अर्ज केला पाहिजे आणि त्यासोबत खालील दस्तऐवज जोडलेले असावेत.

(अ) वस्तुनिर्माण प्रक्रियेचे, तिच्या निरनिराळ्या अवस्थातील संक्षिप्त वर्णनासह क्रमदर्शक आरेखन, वापरलेल्या कच्च्या मालाची यादी, अंत्यःस्थित इ. उत्पादने, उप उत्पादने, त्यांचे परिमाणे, साठविण्याच्या पद्धती आणि हाताळणी, परिवाहनातील भार भरण आणि व्यवसाय नकाशाच्या आणि द्रावणाच्या विल्हेवाटीच्या व्यवस्थेचा तपशील, संभाव्य धोका व आपत्ती वर नियंत्रण ठेवण्याच्या पद्धती.

(ब) पुढील बाबी दर्शविणारे आणि प्रमाण घेऊन काढलेली आरेखने, द्वीप्रतीत—

(एक) कारखान्याची जागा आणि लगतच्या इमारती व इतर संरचना रस्ते, गटारे वगैरे धरून सभोवतालचा परिसर,

(दोन) नैसर्गिक उजेड, हवा खेळती ठेवण्याची सोय, आणि आगीच्या वेळी सुटकेचे मार्ग यासंबंधीचा सर्व आवश्यक तपशील दर्शवून निरनिराळ्या इमारतींचा नकाशा, उंची व आवश्यक ते स्तरच्छेद संयम यंत्रसामग्री मुख्य दालनाचे पार्श्वभाग व जाण्या-येण्याचे मार्ग यांची जागादेखील या नकाशात दाखवली पाहिजे, आणि—

(क) मुख्य निरीक्षक, कारखाने यांना आवश्यक वाटेल असा इतर तपशील.

(४) हे नकाशे या अधिनियमाच्या आवश्यकतानुरुप आहेत अशी मुख्य निरीक्षक यांची खात्री झाल्यास त्याला विनिर्दिष्ट करता येईल अशा शर्तीच्या अधीन राहून, त्यावर स्वाक्षरी करून तो मान्यता देईल व प्रत्येक नकाशाची एक प्रत अर्जदारास परत देईल किंवा अशा प्रकारची मान्यता देणे शक्य व्हावे यासाठी त्याला आवश्यक वाटणारा इतर तपशील मागवता येईल.

४. मुख्य नियमाच्या ३ (अ) नंतर, खालील नवीन पोट-नियम ३-अ(२) समाविष्ट करण्यात येईल :-

" नियम ३-अ (२)—धोकादायक कारखाने वगळून इतराकरिता— कारखान्याचे बांधकाम, कारखान्याचे विस्तार किंवा पुनर्बांधणी किंवा नवीन जागा सध्याच्या कारखान्यास जोडलेली असल्यास, सक्षम अधिकाऱ्याने नमुना १ अ मध्ये अभियंतत्व स्थापत्याच्या संबंधात दिलेले स्थैर्यता प्रमाणपत्र, परवाना दिल्यापासून बारा महिन्याच्या आत मुख्य निरीक्षकांच्या मान्यतेसाठी भोगवटादार सादर करील.

५. मुख्य नियमाच्या नियम ५च्या उप नियम (१) मधील " नमुना २ " या मजकुराऐवजी " नमुना १ " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

६. मुख्य नियमाच्या नियम ५ नंतर खालील नवीन नियम ५अ समाविष्ट करण्यात येईल :-

५अ—परवाना नोंदणी व मान्यतेसाठीचा अर्ज.

धोकादायक कारखाने वगळून इतर कारखान्यांकरिता या कायद्याच्या कक्षेत येणाऱ्या प्रत्येक कारखान्याचा भोगवटादार किंवा व्यवस्थापक मुख्य निरीक्षक, कारखाने यांचेकडे दहा वर्षांपेक्षा जास्त नाही, इतक्या कालावधीसाठी परवाना मंजुरीसाठी व कारखान्याच्या नोंदणीकरिता नमुना १ मध्ये अर्ज सादर करील. अशा प्रत्येक अर्जासोबत कारखान्याचा मोजमाप नसलेला व मितीसह आकस्मिक निर्गमन सुस्पष्टपणे दर्शविलेला नकाशा जोडण्यात येईल. तसेच परवाना ज्या अटींवर मंजूर करण्यात आलेला आहे अशा अटी विहित कालावधीत पूर्ण करण्याबाबतचे स्वयं घोषणापत्र सादर करील.

७. मुख्य नियमाच्या नियम ६ नंतर खालील नवीन नियम ६अ समाविष्ट करण्यात येईल :-

६अ—परवाना देणे.

नियम ५अ नुसार अर्ज प्राप्त झाल्यानंतर व पोटनियम २, नियम ५ नुसार, शुल्क भरल्यानंतर मुख्य निरीक्षक, कारखाने परवाना प्रदान करण्यास हरकत नसल्याबाबत त्यांचे समाधान झाल्यावर सात कार्यालयीन दिवसांचे आत अर्जदाराने अर्जात नमूद केल्यानुसार कारखाना वा जागा यांचा वापर करण्यासाठी कारखान्याची नोंदणी करील व पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून नमुना ४ मध्ये परवाना प्रदान करील.

(*i*) नियम ३ (३) नुसार कारखान्याच्या इमारतीचा नकाशा मान्य करून घेईल.

(*ii*) ज्या अटी व शर्तींच्या अधीन राहून नकाशा मंजूर करण्यात आला आहे त्याची पूर्तता करील.

(*iii*) नियम ३ (अ) (२) नुसार कारखाना इमारतीचे सक्षम प्राधिकाऱ्याकडून स्थैर्यता प्रमाणपत्र घेण्यात येईल.

(*iv*) ज्या अटींच्या अधीन राहून परवाना देण्यात आलेला आहे, त्या अटींची, परवान्याच्या दिनांकापासून बारा महिन्याच्या आत पूर्तता करण्यात येईल.

(*v*) बारा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर परवान्यात नमूद अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्याबाबत मुख्य निरीक्षक, कारखाना यांचे समाधान झाल्यास सुनावणीची योग्य संधी देऊन, परवाना निलंबित अथवा मागे घेण्यात येईल.

परंतु, परवाना देण्यात आलेल्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत एखादा प्राणघातक अपघात किंवा धोकादायक घटना घडल्यास परवाना मागे घेण्यात येईल.

८. मुख्य नियम ७ च्या पोट-नियम (३) नंतर पोट-नियम (४) चा समावेश करण्यात येईल :—

" (४)—(*i*) नियम ६-अ अन्वये धोकादायक कारखान्याचा परवाना वगळून मंजूर करण्यात आलेल्या परवान्याची दुरुस्ती, मुख्य निरीक्षक, कारखाने किंवा उप मुख्य निरीक्षक किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास करता येईल.

(*ii*) कारखान्याच्या नावात बदल झाल्यास किंवा कारखाना उभारला असेल त्या जागेच्या नावात बदल झाल्यास किंवा परवान्यामध्ये विनिर्दिष्ट केलेली अश्वशक्ती किंवा तेथे कामावर लावलेल्या लोकांची संख्या यांच्या मर्यादेत वाढ झाल्यास परवानाधारकास ज्याच्या परवान्यामध्ये दुरुस्ती करावयाची आहे, अशा परवानाधारकाने तो परवाना, दुरुस्तीचे स्वरूप आणि कारणे नमूद केलेला अर्ज राज्य शासनाने प्राधिकृत केलेले मुख्य निरीक्षक, कारखाने किंवा उप मुख्य निरीक्षक यांचेकडे पोट-नियम (१) अन्वये सादर करील.

९. मुख्य नियमाच्या, नियम ८ मध्ये,—

(१) पोट-नियम (१) मध्ये,

" नमुना २ " या शब्दाऐवजी " नमुना १ " आणि " धनादेश " या शब्दाऐवजी " डिमांड ड्राफ्ट किंवा इलेक्ट्रॉनिक पेमेंट " हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

(२) मुख्य नियमाच्या पोट-नियम (२) नंतर, खालील पोट-नियम (३) चा नव्याने समावेश करण्यात येईल :—

" (३) परवाना नूतनीकरण "

धोकादायक कारखाना वगळून परवान्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटींची पूर्तता झाल्याशिवाय मुख्य निरीक्षक, कारखाने हे त्या परवान्याचे नूतनीकरण करणार नाहीत.

१०. मुख्य नियमाच्या नियम ९ मध्ये,—

(१) स्पष्टीकरणात उल्लेखिलेल्या " किंवा धनादेश " या शब्दांऐवजी किंवा डिमांड ड्राफ्ट " किंवा इलेक्ट्रॉनिक्स पेमेंट " हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

(२) स्पष्टीकरणानंतर खालील परंतुकाचा समावेश करण्यात येईल :—

" पुन्हा असे नमूद करण्यात येते की, धोकादायक कारखान्या व्यतिरिक्त असलेल्या कारखान्यांच्या बाबतीत ज्यांनी कारखान्याच्या परवाना मंजुरीकरिता व नूतनीकरणाकरिता वरील नियमाच्या अनुषंगाने अर्ज केलेला आहे. आणि जर सात कार्यालयीन दिवसांत परवाना मंजूर करण्यात आला नसल्यास किंवा त्यांचे नूतनीकरण केले नसल्यास, अशा कारखान्यांना मानीव परवाना दिलेला आहे किंवा नूतनीकरण केले आहे, असे गृहित धरण्यात येईल. "

११. मुख्य नियमांच्या, नियम १३ मधील पोट-नियम (२) मध्ये " नमुना २ " या शब्दांऐवजी " नमुना १ " हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

१२. मुख्य नियमाच्या, नियम १४ मधील " नमुना २ " या शब्दांऐवजी " नमुना १ " हे शब्द समाविष्ट करण्यात येतील.

१३. नमुना २ वगळण्यात येईल.

१४. सध्या अस्तित्वात असलेल्या नमुना १ ऐवजी खालील नमुना १ व प्रश्नावलीचा समावेश करण्यात येईल.

## नमुना १

**(नियम ३, ५, ८, ११ आणि १४ पहावे)**

विहित नवीन कारखाना बांधणे, विद्यमान कारखान्याचा विस्तार करणे, सध्याची इमारत कारखाना म्हणून उपयोगात आणणे, कलम ६ व ७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यवसायाच्या नोंदणीसाठी आणि कारखान्याच्या परवान्यासाठी व त्याच्या नूतनीकरणासाठी अर्ज व नोटीस

(* जे लागू असेल त्याला ✓ करावे)

| रुपये १० चा<br>कोर्ट फी स्टँप |
|---|

१. कारखान्याचे संपूर्ण नाव व पत्ता

दूरध्वनी क्रमांक

फॅक्स क्रमांक

ई-मेल

२. यापूर्वी नोंदणी झाली असल्यास, नोंदणीचा महिना व वर्ष

३. परवाना क्रमांक मंजूर झाला असल्यास,

४. संदर्भ क्रमांक आणि राज्य शासन/मुख्य कारखाने निरीक्षक/उप मुख्य कारखाने निरीक्षक/सहा. मुख्य कारखाने निरीक्षक यांनी आराखड्याला नुकतीच मान्यता दिल्याचा दिनांक

५. निर्मिती प्रक्रियेचा स्थूल आराखडा त्याच्या विविध टप्प्यांच्या प्रक्रियेचे संक्षिप्त तपशीलासह वापरण्यात आलेल्या कच्च्या मालाची यादी, उप उत्पादन, ऑक्सिक गॅसच्या एमिशनसह, त्याचे प्रमाण, साठा करण्याच्या आणि हाताळण्याच्या पद्धती, भरणे आणि वाहतूक आणि कारखान्यातील टाकाऊ वस्तुंची विल्हेवाट लावण्याच्या आणि त्याचे वाहून नेणे, संभाव्य धोके व त्यांचे नियंत्रण किंवा दूर करणे इत्यादी व्यवस्थांचे तपशील (गरज भासल्यास स्वतंत्र पत्र जोडावे).

६. बसावयाच्या संयंत्राचा तपशील

७. परवाना किंवा परवान्याचे नूतनीकरण यासाठी अर्ज करण्याचा कालावधी (दहा वर्षांपेक्षा अधिक नसेल)

८. वर्षभरात कोणत्याही एका दिवशी कामावर ठेवलेल्या कामगारांची कमाल संख्या. स्त्री पुरुष एकूण

९. स्थापित अश्वशक्ती/के.डब्ल्यू. मध्ये स्थापित क्षमता

१०. भोगवटादाराचे संपूर्ण नाव व निवासी पत्ता (संचालक/भागीदार/मालक)

जन्मतारीख

नागरिकत्व

भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल

भोगवटादाराची सही ........................

ाणणे,

११. व्यवस्थापकाचे संपूर्ण नाव व निवासी पत्ता

जन्मतारीख

नागरिकत्व

भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल

व्यवस्थापकाची सही ........................

१२. कोषागार चलन/दर्शनी धनाकर्ष किंवा पुस्तक समायोजनाद्वारे........................... इतकी रक्कम आदेश क्रमांक ..................... दिनांक................................ द्वारे भरली.

**स्पष्टीकरण :**

१. भोगवटादार याचा अर्थ, कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम २ (एन) नुसार, संचालक, भागीदार किंवा मालक असा आहे.

२. परवाना नूतनीकरण अर्ज, परवाना ज्या दिनांकास समाप्त होणार असेल त्या दिनांकापूर्वी परवाना शुल्क किमान दोन महिने अगोदर नूतनीकरणाकरिता सादर करण्यात येईल.

३. वरील माहितीतील उदा. कारखान्याच्या नावातील बदल, भोगवटादार/व्यवस्थापक यांच्यामधील बदल, कामगारातील बदल किंवा अश्वशक्ती (हॉर्स पॉवर) किंवा दोन्ही, विद्यमान स्लॅबद्वारे उच्च मर्यादेपेक्षा अधिक इत्यादीमध्ये कोणताही बदल या कार्यालयाकडे त्या त्या नमुन्यात सादर करून कळविण्यात येईल.

**टीप.**— भागीदारी विलेखाची सध्याची प्रत संचालकांच्या यादीसह ज्ञापनाची प्रत/ भोगवटादार असल्याचा पुरावा सोबत जोडावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बी. एस. कोळसे,**

शासनाचे सहसचिव.

In pursuance of clause (3) of Article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No. FAC. 11/2014/C.R. 341/Lab-4, dated the 28th September 2015 is hereby published under the authority of the Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

B. S. KOLASE,
Joint Secretary to Government.

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya
Mumbai 400 032, dated the 28th September 2015

*NOTIFICATION*

FACTORIES ACT, 1948.

No. FAC. 11/2014/C.R. 341/Lab-4.—In exercise of the powers conferred by section 112 and 115 of the Factories Act, 1948 (63 of 1948), in its application to the State of Maharashtra, (hereinafter referred to as "the said Act"), read with clause 3 of section 23 of the General Clauses Act, 1897 (10 of 1987) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby amends the Maharashtra Factories Rules, 1963, the same having being previously published as required under sub-section *(1)* of section 115 of the said act, as follows namely :—

1. These rules may be called the Maharashtra Factories (Amendment) Rules, 2015.

2. In rule 2 of Maharashtra Factories Rules, 1963 after sub-rule *(n)*, the following sub-rule *(o)* shall be added :—

(*o*) Hazardous Factory,—

"Hazardous Factory" means a factory in which manufacturing process is carried out involving use, storage, handling or processing of any substance which is flammable, toxic, explosive, highly reactive chemical as defined in clause (*a*) of rule 2 of the Maharashtra Factories (Control of Industrial Major Accident Hazards) Rules, 2003 or 'corrosive substance' as defined in sub-clause (*a*) of clause (1) of Schedule XII prescribed under rule 114 of the principle rules or where such substances are evolved in the manufacturing process.

3. (*i*) In sub-rule (1) of Rule 3 of the principal Rules, for the word "factory" the word "hazardous factory" shall be substituted.

(*ii*) After sub-rule (2) of Rule 3, the following new sub-rule (3) and (4) shall be added :–

(3) In case of factory other than hazardous factory,–

An application for obtaining permission for the site on which the factory is situated and for the construction or extention of a factory shall be made to the Chief Inspector of Factories.

Application for such permission shall be made in Form 1 which shall be accompanied by the following documents :—

(*a*) A flow chart of the manufacturing process supplemented by a brief description of the process in its various stages, list of the raw materials used, intermediate products etc. finished products, by-products, their quantities, methods of storage and handling, loading and transport and details of the arrangements for the disposal of trade waste and effluents, the likely hazards and the methods to control or eliminate them.

(*b*) Plans in duplicate drawn to scale showing :—

(*i*) The site of the factory and immediate surroundings including adjacent buildings and other structures, roads, drains etc. ;

(*ii*) The plan, elevation and necessary cross-sections of the various buildings, indicating all relevant details relating to natural lighting, ventilation and means of escape in case of fire. The plans shall also clearly indicate the position of the plant and machinery, aisles and passage ways ; and

(*c*) Any other particulars as the Chief Inspector of Factories may require.

(4) If the Chief Inspector of Factories is satisfied that the plans are in consonance with the requirements of the Act, he shall, subject to such conditions as he may specify, approve them by signing and returning to the applicant one copy of each plan or he may call for such other particulars as he may be require to enable such approval to be given. ".

4. After Rule 3-A of the Principal Rules the following sub-rule 3-A (2) shall be inserted :—

" Rule 3-A (2)–In case of a factory other than Hazardous factory, a Certificate of Stability in respect of every work of engineering construction in Form 1-A issued by a Competent Person shall be sent by the Occupier of the factory within twelve months from the issuance of license to the Chief Inspector of Factories and approved by him for the factory constructed re-constructed or extended or any premises which has been taken into use as a factory or part of the factory.".

5. In Rule 5 of the principal Rules, in sub-rule (1) for the word and figure " Form 2 " the word and figure " Form 1 " shall be substituted.

6. After Rule 5 of the Principal Rules the following Rule 5-A shall be inserted :—

" 5-A. *Application for registration and grant of licence.*—The occupier or manager of every factory other than hazardous factories coming within the scope of this Act shall submit to the Chief Inspector, an application in " Form 1 " for the registration of the factory and for the grant of licence of therefor for a period not exceeding ten year, accompanied by a plan of the factory not necessary to scale showing clearly all the emergency exits with dimensions and a self declaration stating that conditions mentioned in the licence will be complied within stipulated period.

7. After rule 6 of the principal Rules, the following Rule 6-A shall be added :—

" 6-A. *Grant of licence.*—The Chief Inspector may, on application being made to him under rule 5-A and on payment of fees prescribed in sub-rule (2) of Rule 5 thereof and on being satisfied that there is no objection to the grant of licence applied for, register the factory and issue a licence in Form 4, within seven working days to the applicant to use as a factory such a premises as are specified in application and subject to compliance with following conditions as are specified in the licence,—

(*i*) The plan of factory shall be got approved as per rule 3(3).

(*ii*) The conditions subject to which the plans are approved shall be complied with.

(*iii*) The Certificate of Stability in respect of every work of engineering construction shall be obtained from competent person as per rule 3-A(2).

(*iv*) Condition subject to which license is issued shall be complied within a period of twelve months from the date of issuance.

(*v*) If after the expiry of the period of twelve months mentioned in clause (iv) the Chief Inspector is satisfied that, there is a breach of any terms and conditions mentioned in the licence, he may suspend or revoke the licence after giving a reasonable opportunity of being heard :

Provided that, if any fatal accident or dangerous occurrence took place within a period of twelve months from the date of issue of licence, the licence shall be revoked forthwith.".

8. In rule 7 of the principal Rules, after sub-rule (3), the following new sub-rule (4) shall be added :—

"(4)–(*i*) A licence granted under Rule 6-A to the factory other than hazardous factory may be amended by Chief Inspector or Deputy Chief Inspector authorised by the State Government in this behalf".

(*ii*) A licence shall be required to have his licence amended if there is change in the name of the factory or in the site on which the factory is situated or if the factory which the licence is granted exceed the limits specified in the licence in regard to horse power or the number of persons employed. The licensee whose licence is required to be amended shall submit it to the Chief Inspector or Deputy Chief Inspector authorised by the State Government in this behalf with an application stating the nature of amendement and reasons thereof.

9. In Rule 8 of the principal Rules,—

(*1*) In sub-rule (1),—

The words "in Form 2" shall be replaced by the words "in Form 1" and the word "a cheque" shall be replaced by the words "Demand Draft or Electronic Payment".

(2) After sub-rule (2) of the Principal Rules, the following new sub-rule (3) shall be added :

"(3)–Renewal of licence,—

The Chief Inspector shall not renew the licence, issued to the factory other than Hazardous factory unless all the conditions subject to which the license was issued have been complied with

10. In rule 9 of the Principal Rules,—

(1) In *Explanation,* the words "or a Cheque" shall be substituted by the words "or Demand Draft or Electronic Payment".

(2) after *Explanation,* the following proviso shall be added, namely :—

"Provided further that, in case of the factory other than hazardous factory, where an application for grant or renewal of license is duly made in accordance with these rules and if no license has been issued or renewed within a period of seven working days, the factory in respect of which the license is to be granted or renewed shall be deemed to be duly licensed.".

11. In sub-rule (2) of the Rule 13 of the Principal Rules, the word "Form 2" shall be substituted by the word "Form 1".

12. In Rule 14 of the principal Rules, the "Form 2" shall be substituted by "Form 1".

13. Form 2 shall be deleted.

14. For existing "Form 1" the following "Form 1" shall be inserted :—

# "FORM 1

(*See* rules 3, 5, 8, 11 and 14)

Application for permission to construct a new factory, to extend existing factory or take into use any building as a Factory/ Application for Registration and Notice of occupation specified in sections 6 and 7 and for Grant of license*/Renewal of licence* of a factory

(* Mark ✓ which is applicable)

| Court Fee Stamp of Rs. 10 |
| --- |

1. Full name and address of factory
   Telephone Number
   Fax Number/
   E-Mail
2. If already registered, month and year of registration
3. Licence number, if granted
4. Reference number and date of latest approval of the plans by the State Government / Chief Inspector of Factories / Joint Chief Inspector of Factories / Deputy Chief Inspector of Factories.
5. A flow chart of the manufacturing process supplemented by a brief description of the process in its various stages, list of the raw materials used, intermediate products, including emission of toxic gases, etc., finished products, by- products, their quantities, methods of storage and handling, loading and transport and details of the arrangements for the disposal of trade waste and effluents, the likely hazards and the method of control or eliminate them. (Attach separate sheet if required).
6. Particulars of plants to be installed.
7. The period for which licence or renewal of licence is applied for (not exceeding ten years).
8. Maximum number of workers to be employed on any one day during the year. Male Female Total
9. Installed power in H.P.
10. Full name and residential address of Occupier
    Director/Partner/Proprietor
    Date of Birth
    Nationality
    Mobile No. and E-mail
    Signaturte of Occupier

11. Full name and
residential address of Manager.
Date of Birth
Nationality
Mobile No. and E-mail
Signature of Manager.

12. Amount of fees Rs. .......................... paid *vide* Treasury Challan/Demand Draft or by book adjustment *vide* Order No. ............................... dated the ...................................... . ".

*Explanation* :—

1. Occupier means Director, Partner or Proprietor, as per section 2(n) of the Factories Act, 1948.

2. Licence renewal application shall be sumitted for renewal at least two months in advance alongwith license fees before the date which the license is due to expire.

3. Any change in above information e. g. change in a factory name, change in Occupier/ Manager, change in worker or Horse Power or both exceeding the upper limit by submitting the same form to this office.

*Note.*— Latest copy of partnership deed/copy of article if memorandum with list of Directors / proof of occupiership shall be enclosed.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

B. S. KOLASE,

Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.